दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ८४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

### भरघोस नफ्याचे आमिष अन् 9.35 लाखांचा गंडा

**जळगाव :** गेल्या काही दिवसांपासून सायबर गुन्हेगारीमध्ये मोठी वाढ झाल्याचे चित्र आहे. जळगाव जिल्ह्यातील व्यापारी असाच सायबर गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकला अन त्याला लाखो रुपयांचा गंडा बसला आहे. स्टॉक मार्केट आणि आयपीओमध्ये गुंतवणूक करून भरघोस नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत जळगावातील व्यावसायिकाची फसवणूक झाली आहे.व्यावसायिकाची तब्बल ९ लाख ३५ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली असून या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात अज्ञात सायबर भामट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### हॉटेल व्यावसायिक प्रकरणानंतर सलग दुसऱ्या दिवशी शहर कडकडीत बंद

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर शहरात गुन्हेगारांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे. गेल्या अकरा दिवसात चार जणांवर प्राणघातक हल्ला केल्याच्या घटना शहरात घडल्या आहेत. अवघ्या ११ दिवसांत प्राणघातक हल्ल्याच्या तब्बल चार घटना घडल्याने आधीच दहशतीत असलेल्या श्रीरामपूरकरांच्या संयमाचा बांध अखेर शनिवारी भरदुपारी फुटला. एका तरुण हॉटेल व्यावसायिकाची हत्येमुळे संपूर्ण शहर हादरले असून, या गुंडशाहीविरोधात व्यापारी, सामाजिक संघटना आणि सर्वपक्षीय नेत्यांनी 'बेमुदत बंद' पुकारला आहे.

## एसटी डेपोंच्या जमिनी भाड्याने देणार
### 98 वर्षांचे लीज मॉडेल; एसटीची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी निर्णय

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) मोक्याच्या जागांचा आणि डेपोचा पुनर्विकास करून महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. एसटी डेपोंच्या पुनर्विकासातून उत्पन्न वाढवण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या (पीपीपी) माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. या अंतर्गत प्रत्येक डेपोची व्यावसायिक क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र विकास आराखडा तयार केला जाणार असून, पुनर्विकासाला गती देण्यासाठी आवश्यक तो धोरणात्मक प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळासमोर सादर केला जाईल. एसटी महामंडळाच्या जागांची मालकी कायम महामंडळाकडेच सुरक्षित राहावी, याकरिता '४९ अधिक ४९' म्हणजेच एकूण ९८ वर्षांच्या लीज



मॉडेलचा (भाडेपट्टी) विचार केला जात असून, यामुळे एसटीच्या जागांचे प्रभावी व्यावसायिक मूल्यवर्धन साधता येणे शक्य होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाची एक उच्चस्तरीय आढावा बैठक 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी पार पडली. या बैठकीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए.शैला, महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, एसटी डेपो विकसित करताना सरधोपट पद्धत न वापरता प्रत्येक डेपोची स्थानिक व्यावसायिक क्षमता आणि गरज लक्षात घेऊन स्वतंत्र नियोजन करण्यात यावे. जे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य आणि फायदेशीर ठरतील, त्यांमधून प्राप्त होणारा महसूल एका स्वतंत्र 'एस्क्रो खात्यात' जमा केला जावा. या खात्यातील निधीचा वापर महामंडळाच्या इतर रखडलेल्या विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी करण्यात यावा. तसेच, पीपीपी धोरणांतर्गत डेपोचा विकास करणाऱ्या विकासकांना कोणत्या सवलती देता येतील, याबाबींचा सविस्तर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यासोबतच, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी मुद्रांक शुल्कात (स्टॅम्प ड्युटी) सवलत देण्याबाबतच्या कायदेशीर बाबींची तपासणी करण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला केली.

## लाडकी बहीण योजनेतून 92 लाख नावे वगळली
### ई-केवायसी प्रक्रियेत अपात्र

**मुंबई :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थी महिलांसाठी मोठी अपडेट समोर आली आहे. शासनाकडून करण्यात आलेली ई-केवायसी (e-KYC) प्रक्रियेनंतर तब्बल ९२ लाख महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. परिणामी, अपात्र ठरलेल्या लाखो बहिणींचा दरमहा मिळणारा हप्ता




आता कायमचा बंद होणार आहे. सुरुवातीला सुमारे ८० लाख महिला या योजनेतून कमी होतील असा अंदाज सरकारने वर्तवला होता; मात्र प्रत्यक्ष छाननीअंती हा आकडा ९२ लाखांच्या पार गेला आहे.

योजनेच्या पारदर्शकतेसाठी राबवण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत राज्यातील अनेक जिल्ह्यांमधून अपात्र महिलांची नावे यादीतून कमी करण्यात आली आहेत. यामध्ये बीड (Beed) जिल्ह्याचा आकडा सर्वाधिक मोठा आणि चक्रावून टाकणारा आहे. एकट्या बीड जिल्ह्यातून तब्बल २८ लाख महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेत ज्या महिलांची नावे चुकीच्या किंवा तांत्रिक पद्धतीने वगळली गेली आहेत, त्यांच्या तक्रारींची योग्य दखल घेऊन चौकशी केली जाईल, अशी ग्वाही देखील सरकारकडून देण्यात आली आहे.

## थोडक्यात वार्ता

### 'आईने लग्न ठरवलं...', तरुणीने भलतंच कांड केला



**नवी मुंबई :** सिया आणि केतन या बहुचर्चित हत्याकांडाची चर्चा अद्याप ताजी असतानाच, नवी मुंबईतील ऐरोली परिसरातून एक अंगावर काटा आणणारी घटना उघडकीस आली. व्हिडिओतील तरुणीचे नाव कीर्तन मेनन असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, तिने केस काढण्यामागचे नेमके कारण कुठेही स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे सोशल मीडियावर विविध तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. काही नेटकऱ्यांनी हा प्रकार इच्छेविरुद्ध ठरवण्यात आलेल्या लग्नाविरोधातील निषेध असल्याचे म्हटले आहे. तर काहींनी याकडे महिलांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे आणि स्वतःचे निर्णय घेण्याच्या अधिकाराचे प्रतीक म्हणून पाहिले आहे. मात्र, या सर्व दाव्यांना अद्याप कोणताही अधिकृत आधार मिळालेला नाही. केस काढण्यामागे धार्मिक परंपरा, केसदान, वैयक्तिक निर्णय किंवा केवळ सोशल मीडियासाठी तयार केलेला आशय असू शकतो. यापैकी कोणत्याही कारणाची पुष्टी झालेली नाही.

### आयबी अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी माजी नगरसेवक ताहिर हुसेन दोषी

**नवी दिल्ली:** २०२० च्या ईशान्य दिल्ली दंगलीदरम्यान गुप्तचर विभागातील (IB) अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी दिल्लीतील कर्करडूमा न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला आहे. न्यायालयाने आम आदमी पक्षाचे (AAP) माजी नगरसेवक ताहिर हुसेन यांना अंकित शर्मा यांच्या हत्येसह विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवले आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रवीण सिंह यांनी हा निकाल सुनावला.

**न्यायालयाने ताहिर हुसेन यांना खालील कलमांखाली दोषी ठरवले आहे:**

**कलम ३०२:** हत्या

**कलम १५३A:** दोन गटांमध्ये वैमनस्य पसरवणे

**कलम १४७, १४८, १४९:** दंगल आणि बेकायदेशीर जमाव

**कलम ३६५:** अपहरण

**कलम १८८:** सार्वजनिक अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन

दरम्यान, न्यायालयाने ताहिर हुसेन यांची 'कट रचणे' (कलम १२०बी) आणि कलम १२९ या आरोपांतून निर्दोष मुक्तता केली आहे.

### संशयितांना जामीन मंजूर पण.... कोर्टाने घातल्या अटी

**नाशिक :** नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या नाशिकच्या टीसीएस प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. कंपनीतील धार्मिक छळ प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तिन्ही संशयितांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मात्र, जामीनासोबतच खबरदारीचा उपाय म्हणून न्यायालयाने महत्त्वाची आणि कडक अट घालत संशयितांना थेट नाशिक शहरात प्रवेश करण्यास बंदी घातली आहे. टीसीएस कंपनीत सहकाऱ्याचा कथित धार्मिक छळ केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले रझा रफिक मेमन, तौसिफ बिलाल अत्तार आणि शाहरुख हुसेन शौकत कुरेशी या तिन्ही संशयितांना न्यायालयाने प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. मात्र, तपास पूर्ण झाल्यानंतर जामीन देताना न्यायालयाने संशयितांवर कठोर निर्बंध लादले आहेत. त्यानुसार, या तिन्ही संशयितांना नाशिक शहरात राहण्यास तसेच शहरात मुक्तपणे प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. न्यायालयाच्या या आदेशामुळे जामीन मिळाला असला तरी संशयितांना शहराबाहेरच राहावे लागणार आहे.

### "शाल जोडे"




## सकाळी लवकर उठ म्हणताच सुनेचा संताप! सासूला बेदम मारहाण

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातून एक अतिशय धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. शेतात भात लावणीच्या कामासाठी सकाळी लवकर उठण्यास सांगितल्याच्या कारणावरून एका सुनेने आपल्या ७१ वर्षीय वृद्ध सासूला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकारामुळे रेहेळ-गावणवाडी परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने कोकणात शेतीची कामे, विशेषतः भात लावणीची लगबग सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर चिपळूण तालुक्यातील रेहेळ-गावणवाडी येथे राहणाऱ्या ७१ वर्षीय सासूने आपल्या सुनेला सकाळी शेतीच्या कामासाठी लवकर उठण्यास सांगितले. मात्र, सासूची ही साधी सूचना सुनेला चांगलीच झोंबली.

लवकर उठण्याचे सांगताच सुनेचा पारा चढला. तिने सासूशी वाद घालण्यास सुरुवात केली आणि रागाच्या भरात वृद्ध सासूला अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता तिने घरातील एक लाकडी फाटा उचलला आणि सासूला बेदम मारहाण केली. या अनपेक्षित आणि हिंसक हल्ल्यात वृद्ध सासू गंभीर जखमी झाली आहे.


**पोलिसांत गुन्हा दाखल**

मारहाणीच्या या प्रकारानंतर जखमी सासूने धिरोदात्तपणे थेट चिपळूण पोलीस ठाणे गाठले आणि आपल्या सुनेविरुद्ध रीतसर तक्रार दाखल केली.

## जे साध्य करायला पुरुष संघाला ५४ वर्षे लागली, ते भारतीय महिला संघानं अवघ्या चार दिवसांत करून दाखवलं
### भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेट संघाच्या लॉर्ड्सवरील विजयात कमालीचा योगायोग

**मुंबई :** भारत विरुद्ध इंग्लंड महिला संघांत लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर पहिला महिला कसोटी सामना खेळवण्यात आला. या सामन्यात भारतीय महिला संघाने २७० धावांनी दिमाखदार विजय मिळवत इतिहास रचला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली लॉर्ड्सवर कसोटी जिंकणारा भारत हा पहिला महिला संघ ठरला. भारतीय महिला संघाने हा ऐतिहासिक पराक्रम अवघ्या चार दिवसांत साध्य केला. दुसरीकडे, भारतीय पुरुष संघाला लॉर्ड्सवर पहिला कसोटी विजय मिळवण्यासाठी तब्बल ५४ वर्षे आणि ११ कसोटी सामन्यांची प्रतीक्षा करावी लागली होती.

पुरुष संघाला ५४ वर्षांनंतर मिळाला होता लॉर्ड्सवरील पहिला



विजय

भारतीय पुरुष संघाने लॉर्ड्सवर पहिली कसोटी २५ ते २८ जून १९३२ दरम्यान खेळली होती. क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या मैदानात त्यावेळी इंग्लंडच्या संघाने टीम इंडियाला १५८ धावांनी पराभूत केले होते. १९८२ पर्यंत १० कसोटी सामन्यानंतरही भारताची पाटी कोरीच होती. अखेर १९८६ मध्ये, लॉर्ड्सवरील ११ व्या कसोटीत भारताला पहिला विजय मिळाला.

क्रिकेटच्या पंढरीत भारतीय 'रन'रागिणींचा महा-पराक्रम; इंग्लंडचा २७० धावांनी धुव्वा उडवत नोंदवला ऐतिहासिक विजय

भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेट संघाच्या लॉर्ड्सवरील विजयात कमालीचा योगायोग

५ ते १० जून १९८६ या कालावधीत खेळवण्यात आलेल्या या सामन्यात कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने इंग्लंडचा पाच विकेट्स राखून पराभव केला होता. कपिल देव यांनी लॉर्ड्सवरील पहिल्या विजयात मोलाचा वाटा उचलताना पहिल्या डावात एक आणि दुसऱ्या डावात चार विकेट्स घेतल्या होत्या. यात नाबाद २३ धावांच्या खेळीचाही समावेश होता. दिलीप वेंगसरकर यांनी १२६ धावांच्या शतकी खेळीसह संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर आक्षेप
### स्वपक्षातील वरिष्ठ नेत्याने पाठवली नोटीस; निवडणूक पुन्हा घेण्याची मागणी

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत धुसफूस पुन्हा चव्हाट्यावर आली आहे. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सांभाळणाऱ्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार(Sunetra Pawar) यांच्या निवडीला स्वपक्षातूनच जाहीर आक्षेप घेण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी वकिलांमार्फत कायदेशीर नोटीस बजावून सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षपदावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. २६ फेब्रुवारी रोजी झालेली ही निवडणूक पूर्णपणे 'अवैध' असल्याचा दावा करत त्यांनी ही निवड रद्द करून नव्याने निअपक्षपाती निवडणूक अधिकारी नेमून निवडणूक घेण्याची मागणी केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर २०२३ मध्ये अजित पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. मात्र, २८ जानेवारी रोजी दुर्दैवी विमान अपघातात त्यांचे निधन झाले. त्यानंतर पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचीही जबाबदारी सोपवण्यात आली. परंतु, या निवडीच्या कायदेशीर वैधतेवर बोट ठेवत सच्चिदानंद सिंह यांनी ९ जुलै रोजी राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल आणि पक्षाचे सचिव ब्रिजमोहन श्रीवास्तव(Sachin Shrivastav) यांना नोटीस पाठवली आहे. जोपर्यंत पुन्हा रीतसर निवडणूक होत नाही, तोपर्यंत राष्ट्रीय अध्यक्ष आणि सुधारित कार्यकारिणीची यादी रद्द समजली जावी, असे या नोटीशीमध्ये बजावण्यात आले आहे.




वारीच्या गर्दीने छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती बस स्थानक फुल्ल; बसमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची झुंबड.


## घाणीत चालत होता तेलाचा खेळ ; 'बागारिया'वर एफडीएची धाड, लायसन्स केले रद्द!

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** लोकांच्या आरोग्याशी खेळून स्वतःची खिसे भरणाऱ्या नफेखोरांना अन्न व औषध प्रशासनाने (FDA) जोरदार झटका दिला आहे. राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेचा कडक दणका आता छत्रपती संभाजीनगरात बसला असून, अस्वच्छतेचे साम्राज्य असलेल्या दोन मोठ्या ऑइल रिपॅकिंग युनिट्सवर प्रशासनाने थेट सर्जिकल स्ट्राईक केला आहे. पैठण तालुक्यातील मे. बागारिया ॲग्रो प्रॉडक्ट्स आणि शहरातील मे. बागारिया व्हेजिटेबल प्रॉडक्ट्स प्रा. लि. या दोन्ही युनिट्सवर एकाच वेळी छापे मारून तब्बल २ कोटी ९३ लाख ३५ हजार ६०३ रुपयांचा संशयित निकृष्ट दर्जाचा खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे. या गंभीर प्रकारानंतर दोन्ही आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत.

सहाय्यक आयुक्त डी. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने जेव्हा या युनिट्समध्ये पाऊल ठेवले, तेव्हा तिथले दृश्य पाहून अधिकारीही चक्रावून गेले. रिफायनरी विभागातील महागड्या यंत्रसामग्रीवर धूळ, कोळीची जाळी, गंज आणि







### 2.93 कोटींचा तेलसाठा जप्त; नमुने लॅबला रवाना!

**या धडक कारवाईत रिफाइंड पाम, सोयाबीन, कपाशी तसेच एका अज्ञात वनस्पती तेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे. एकूण २.९३ कोटी रुपयांचा हा संशयित निकृष्ट साठा ताब्यात घेऊन त्याचे नमुने तातडीने शासकीय प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठवण्यात आले आहेत. ही धडक कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे, पी. एस. कुचेकर, पी. एस. अजिंठेकर आणि योगेश चिभडे यांच्या पथकाने फत्ते केल.**

साचलेली घाण ढसढशीतपणे दिसत होती. फरशी, भिंती आणि आजूबाजूचा परिसर अत्यंत दुर्गंधीयुक्त होता. सगळ्यात धक्कादायक म्हणजे, ज्या जुन्या आणि वापरलेल्या टिन्स (डब्यांमध्ये) खाद्यतेलाचे रिपॅकिंग केले जात होते, ते अत्यंत अस्वच्छ होते. बंद असलेली रिफायनरी आणि चालू असलेला रिपॅकिंग विभाग एकाच आवारात असल्याने तेल दूषित होण्याचा अत्यंत गंभीर धोका अधिकाऱ्यांनी जागेवरच नमूद केला. "जनतेच्या ताटात विष कालवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. सेफ महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत अशी कडक कारवाई यापुढेही सुरूच राहील," असा कडक इशारा एफडीए प्रशासनाने दिला आहे.

**ना लॅब, ना प्रमाणपत्र; अस्वच्छतेचेच पूर्ण तंत्र!:** तपासणीत असे आढळून आले की, कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या या संस्थेत खाद्यतेलाची गुणवत्ता तपासण्यासाठी आवश्यक असलेली अंतर्गत प्रयोगशाळाच (Lab) गायब होती. तपासणीवेळी तेलाचे विश्लेषण अहवाल किंवा घाऊक स्वरूपात आलेल्या तेलाचे 'सर्टिफिकेट ऑफ ॲनालिसिस' (COA) उपलब्ध नव्हते. तांत्रिक अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली नव्हती. ओव्हरहेड टाक्यांवर कोणते तेल साठवले आहे याची कोणतीही ओळख पटत नव्हती आणि टाक्यांवर घाणीचा जाड थर साचला होता. पाईपलाईन आणि पॅकेजिंग साहित्याच्या फूड ग्रेड प्रमाणपत्रांचा पत्ताच नव्हता!

# सं पा द की य

## लष्करातील 'नारी शक्ती' आणि सक्षमीकरणाचे नवे पर्व

भारतीय सशस्त्र दलात महिलांचे सातत्याने वाढणारे योगदान आणि त्यांचे कर्तृत्व हे आधुनिक भारताच्या बदलत्या सामाजिक व व्यावसायिक दृष्टिकोनाचे एक अत्यंत देदिप्यमान प्रतीक आहे. सैन्यात प्रवेश मिळवण्यापासून सुरू झालेला महिलांचा हा प्रवास आता थेट देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदाच्या सहाय्यक अधिकारी पदापर्यंत पोहोचला आहे. मेजर नव्या शेखावत यांची भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी) म्हणून झालेली नियुक्ती ही केवळ एका लष्करी अधिकाऱ्याची वैयक्तिक कामगिरी नसून, भारतीय लष्कराच्या इतिहासातील एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद टप्पा ठरली आहे. राष्ट्रपती भवनातील या सर्वोच्च शिस्तीच्या आणि प्रतिष्ठेच्या पदावर नियुक्ती होणाऱ्या त्या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत, ही बाब संपूर्ण देशासाठी गौरवास्पद आहे. मेजर नव्या शेखावत यांचा प्रवास हा गुणवत्ता, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण समर्पणाचे उत्तम उदाहरण आहे. संघ लोकसेवा आयोगाच्या संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेतून सैन्य दलात प्रवेश मिळवण्यापासून ते चेन्नई येथील अधिकारी प्रशिक्षण अकादमीमधील अत्यंत खडतर आणि शारीरिक-मानसिक क्षमता पणाला लावणाऱ्या प्रशिक्षणापर्यंत त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली. लष्कराचा कणा मानल्या जाणाऱ्या 'आर्मी सर्व्हिस कॉर्प' म्हणजेच सेना सेवा दलात कार्यरत असताना रसद व्यवस्थापन, वाहतूक आणि जीवनावश्यक सामग्रीचे नियोजन यांसारख्या आव्हानात्मक जबाबदाऱ्या त्यांनी लीलया पेलल्या. सेवेतील त्यांच्या याच व्यावसायिक उत्कृष्टतेची आणि कौशल्याची दखल घेऊन त्यांची निवड राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारीसारख्या अत्यंत जबाबदार पदासाठी झाली आहे, जी त्यांच्या कर्तृत्वावर सैन्याने दाखवलेल्या विश्वासाची साक्ष आहे. राष्ट्रपतींचे सहाय्यक अधिकारी हे पद केवळ लष्करी राजनैतिक प्रोटोकॉलपुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण भारतीय सशस्त्र दलाच्या सन्मानाचे आणि व्यावसायिकतेचे प्रतिनिधित्व करते. आजवर प्रामुख्याने पुरुष अधिकाऱ्यांचे वर्चस्व राहिलेल्या या क्षेत्रात आता महिला अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर हक्काचे स्थान निर्माण केले आहे. भारतीय नौदलापाठोपाठ आता भारतीय सैन्याच्या महिला अधिकाऱ्याने हे पद भूषवणे, हा देशातील 'नारी शक्ती'चा खऱ्या अर्थाने मोठा विजय आहे. २०20 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महिला अधिकाऱ्यांना परमनंट कमिशन देण्याचा जो ऐतिहासिक निर्णय दिला होता, त्याचेच हे सकारात्मक आणि दूरगामी परिणाम आहेत. मेजर शेखावत यांची ही कामगिरी केवळ एक पद नसून, ती देशातील कोट्यवधी तरुणींना भारतीय सैन्याची वर्दी परिधान करून देशसेवा करण्याचे आणि इतिहास घडवण्याचे नवे स्वप्न दाखवणारी एक मोठी प्रेरणा ठरेल यात शंका नाही.

# पत्रकारिता पाकिटा भोवती फिरते.? तेंव्हा.!

पंचवीस वर्षापूर्वीचा काळ होता, मी एका शाळेत विद्यार्थी म्हणून शिकत असताना एका सांस्कृतिक कार्यक्रमाला एक मोठे पत्रकार उपस्थित होते. तेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांचे भाषण कम बौद्धिक मला आजही आठवते, अगदी जसेच्या तसे. तेंव्हा मला सरकार ह्या शब्दांचा अर्थ कळत नव्हता. मी त्यांनाच सरकार समजायचो. कारण सरकार समजावं असं त्यांचं वागणं होत, बोलणं होत, तत्वनिष्ठ आचार आणि विचार होता. समाजावर त्याच लोकांचा प्रभाव पडतो जे स्वतः सांगतात तसे वागतात. आणि जनता त्यांच्याच सोबत असते जे समाजात जमिनीवर असतात. एक काळ होता जेंव्हा पत्रकार मंडळींना समाजात आदराच स्थान होत. पत्रकार आले की लोकं आदबिन उठत आणि त्यांना बसायला जागा देत. पत्रकार हे समाजाची घान साफ करायचे. पत्रकार म्हणजे सत्य, निष्ठा, त्याग, समर्पण ह्यांचं मूर्तिमंत उदाहरण मी पाहिलेले आहेत. आजही समाजात ही संख्या नाही असं नाही. पण आज त्यांना शोधावं लागत. लक्षणीय संख्या ही कमी झालेली आहे. आज ज्याच्या हातात मोबाईल तो पत्रकार झाला आहे आणि त्यामुळे पत्रकारांची विश्वासार्हता कमी झाली आहे. पत्रकार कधीही कोणत्याही सत्तेचा भाग नसतो, पण हल्ली काही संपादक आणि नामवंत पत्रकार एका राज्यसभेसाठी किंवा एका परिषदेसाठी आपल्या मूल्यांना तिलांजली देतात. सत्तेच्या भोवती फिरत त्यांची ह्यात जाते आणि मग सत्य पाहणारा पत्रकार जेंव्हा सत्तेला कवेत घेतो तेंव्हा पत्रकारिता व विश्वास संपतो. कोणत्याही निवडणुकीच्या अगोदर सर्व राजकीय पक्षाकडून पाकीट मिळतात. कारण प्रत्येक पक्षाला वाटतं की आपल्या बद्दल सकारात्मक बातमी आली पाहिजे. ह्याचा अर्थ असा आहे प्रत्येक पक्ष हा आजही पत्रकारांना भितो पण त्याचा आदर आणि जरब पाकीट पत्रकारांनी पार रया घातली आहे. पत्रकारांची वचक आणि जरब संपायला पाकीट पत्रकारिता जबाबदार आहे. व्यवसाय चालवायचा असतो तेंव्हा काही तडजोडी स्वीकाराव्या लागतात हे मान्य पण ती तडजोड मूल्यांवर आली की त्याला तिथेच ठेऊन सत्य म्हणून आपण आपली बाजू मांडली पाहिजे हे जेंव्हा सुरू होईल तेंव्हा पत्रकारांना परत तेच दिवस येतील. देशाच्या संसदेत पत्रकार निवडून गेलेले तीस वर्षापूर्वीची उदाहरण सापडतात, हल्ली तो योग दुर्मिळ झाला आहे. त्याचे कारण आहे आज पत्रकारांना मोठ्या भेटवस्तू मिळतात, त्यातून आपोआप मौन येणं. मानधन घेणं चूक नाही तो आपला अधिकार आहे पण मानधनाच्या नावाखाले मोठ पाकीट आलं की त्या झाले सत्य झाकोळत जात. आणि सत्य झाकाळाव म्हणूनच पाकीट येतं. समाजाला न्याय देता देता कधी कधी पत्रकार आपल्या फायद्याचा विचार करतो तेंव्हा पत्रकारिता मरते. इथे केवळ पत्रकारिता नाही मरत, इथे मरतो सामान्य जनतेचा विश्वास, माणुसकी वरची श्रद्धा, लोकशाहीवरचा विश्वास, आणि मग शायर सादत हसन मंटो म्हणतात त्या प्रमाणे "कोठे की एक तवायफ़ और एक बिका हुआ पत्रकार एक ही श्रेणी में आते हैं, लेकिन इनमें तवायफ़ की इज़्ज़त ज़्यादा होती है।" ह्याचा अनुभव समाजातून येतो...

बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांचा नको तेवढा अभिमान प्रत्येक पत्रकाराला आहे. तो असायलाच पाहिजे कारण पत्रकार मंडळींना आपलं हक्काचं व्यासपीठ मिळवून देणारा हा आद्य पत्रकार आहे. बाळशास्त्री जांभेकर यांनी जेंव्हा पत्रकारिता सुरू केली. त्यांनी 6 जानेवारी 1832 ला आपलं दर्पण नावाचं पहिलं वर्तमानपत्र आपल्या सर्वांच्या समोर आणलं, आपल्यातल्या फार कमी पत्रकारांना त्या वेळेसच्या दर्पणच्या अंकाची किंमत माहिती असेल. त्याकाळी शास्त्रींनी दर्पण ची किंमत एक रुपया ठेवली होती ज्याकाळी सोन १९.३९ रुपये तोळा होतं. इतकी प्रचंड किंमत त्याकाळी एका पेपरची होती. कारण बाळशास्त्री जांभेकर यांना विश्वास होता मी माझ्या वर्तमानपत्रांमध्ये लोकांना वाचायसारखं देईल आणि लोक वाचतील. आज काही मंडळी म्हणते इतकं लिहीत जाऊ नका, लोकं वाचत नाहीत. अरे आपण वाचावं असं लोकांना देत नाहीत म्हणून लोकं वाचत नाहीत. पण बाळशास्त्रीना तो विश्वास होता, आज हा विश्वास पार कुठल्या कुठे उडून गेलाय. आज केवळ आपल्याला रद्दी मिळत नाही म्हणून वर्तमानपत्र लावल्या जातत अशी स्थिती आलेली आहे. कारण पत्रकारांनाच वाचायची सवय दुर्दैवाने राहली नाही. पत्रकारांना सत्य असत्याची जाण दुर्दैवाने राहिली नाही. हे वाईट आहे पण दुर्दैवी वास्तव्य आहे. आपल्या वयाच्या विसाव्या वर्षी बाळशास्त्रींनी आपलं सत्य, निष्ठा, त्याग, समर्पण, लोकहित हा विषय धरून आपली पत्रकारिता सुरू केली. पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, निसर्ग विज्ञान, व्याकरण, गणित, भूगोल या विषयावर बाळशास्त्री सातत्याने लिहीत. मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगु, पारसी, फ्रेंच, ग्रीक इतक्या भाषेचं ज्ञान बाळशास्त्रांना होत. फ्रेंच भाषेतील नैपुण्याबद्दल त्यांचा त्याकाळी फ्रान्सच्या राजाकडून मोठा सन्मान झाला होता. आज किती पत्रकारांना नीट मराठी व्याकरण येत. आणि कितींना असं भाग्य लाभतं. आज पत्रकारिता फक्त पैसे कमविण्याच साधन झालं आहे. काही खुशामतखोर लोकांना खुश करण्याचं साधन झाली आहे. पैसे देऊन एखाद्याची भालावल करण्याचं माध्यम पत्रकारिता झाली आहे. योग्य अयोग्य ह्याचा अभ्यास न करता. मला आर्थिक मदत जो करेल त्याचीच बातमी प्रकाशित करण्याची मानसिकता काही पत्रकार मंडळींची झालेली आहे. त्यामुळे पैसे दिले की पत्रकार मॅनेज होतात असंच चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे अशा काही पत्रकारांच्या वागण्यामुळे पत्रकारितेची जरब आणि धाक हा ना सत्तेला राहिलाय, ना सामान्य व्यक्तीला त्याचा आधार राहिला. सध्या वाटतच असेल तर भीती वाटते. पत्रकार असल्याचा अभिमान बाळगायचा असेल तर पत्रकार ह्या विषयाच्या व्याख्या समजून घेतल्या पाहिजे. आम्ही सत्तेचे दलाल नाही आम्ही जनतेचे माध्यम आहोत हा भाव पत्रकारांमध्ये असला पाहिजे. आजही पत्रकार म्हणल्यानंतर जी नावं समोर येतात ती नावं समोर आल्यानंतर एक मनामध्ये आदर येतो, सत्तेलाही त्याची जरब बसते, सत्ता तिथे आजही घाबरते. कारण ही मंडळी आपल्या एका हातात पेन, एका हातात पांढरा पेज आणि खांद्यावर एक शबनम, आणि अंगावरील चारशे रुपयांच्या कपड्यांमध्ये सत्तेची खोटी लप्तर वेशीवर टांगण्यासाठी तयार असते. आणि सत्याची बाजू निर्भिडपणे मांडत असतात. आश्चर्य आणि वाईट तेंव्हा वाटतं जेंव्हा चौथ्या दर्जाचा नालायक व्यक्ती दारुपिऊन पत्रकारितेला शिवी घालतो आणि त्याचं तोंड बंद करायला तोच पत्रकार लाच घेतो, म्हणजे पत्रकारितेवर पत्रकाराने शिवी ऐकून घेणे आणि नुसती ऐकून नाही तर त्याच्यासाठी त्याच्याच कडून पाकीट घेऊन मौन राहणे म्हणजे आपल्याच आईची दलाली करणे नाही का.?

मुळात ही गरबड का होते.? आपण बातमीदार आहोत, पत्रकार आहोत, समीक्षक आहोत की संपादक आहोत ह्याचीच नीट माहिती नसते. बातम्या पुरवतो तो बातमीदार असतो. एखाद्या बातमीला चिकित्सक वृत्तीने पाहतो तो समीक्षक असतो, ज्याच्या विचारला आणि स्वभावाला एखादी बाब योग्य पद्धतीने रुचली की तो निर्भिडपने मांडतो तो पत्रकार असतो आणि एखादा विचार चिंतनशील पद्धतीने मांडून त्याच्या पुढचा आपला स्वतःचा विचार मांडतो तो संपादक असतो. आणि जो संपादकांच्या पुढचा विचार करत असतो त्याला प्रज्ञावंत किंवा प्रतिभावंत म्हणतात. आज अशी मंडळी शोधावी लागते. दुर्दैवाने बातमीदार स्वतःला पत्रकार समजतात, पत्रकार समीक्षक होतात, समीक्षक संपादकांच्या भूमिकेत शिरतात आणि संपादक स्वतःला सत्ता समजतात त्यामुळे पत्रकार ह्या विषयाची मोठी गडबड आणि बदनामी होत आहे. पूर्णकालिक पत्रकार, अंशकालिक पत्रकार, स्वतंत्र पत्रकार, आपण नेमकं कशात बसतो हे ही त्यांना माहिती नसतं. पण हे काहीही असलं तरीही आजही पत्रकार मंडळींना सन्मान आहे, मान आहे, सत्तेला त्याची भीती आजही वाटते, फक्त पत्रकारांनी पाकीट घेऊ नये, स्नेह भोजनाला जरूर जावं पण स्नेह भोजनाच्या नावाखाली सत्य लपऊ नये, जे आपल्या मूल्यात बसत नाही. स्वार्थ न पाहता समाजाच्या हिताला प्राध्यान्य दिलं तर आजही लोकं आदर करतात. सत्ता भीती बाळगते. आपल्याला बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक, गो.ग. आगरकर, बाबासाहेब आंबेडकर, ना.भा.परुळेकर, दिनू रणदिवे, ह्यांच्या सारखं पत्रकार नाही होता आलं तरी फक्त समाजाने आम्हाला दलाल पत्रकार, पाकीट पत्रकार, थाली पत्रकार, बाटली पत्रकार असं नाही म्हणलं तरी आम्ही उत्तम पत्रकार आहोत असं समजावं आणि आपण आपल्याशी प्रामाणिक आहोत, "ह्या पत्रकाराच जीवन हे पत्रकारितेच्या मुल्यांवर आधारित आहे" असं समाजाने म्हणल तरी आपली पत्रकारिता धन्य होईल...इतकचं...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगांवकर.**

## रघुपति राघव राजाराम सत्याग्रह काँग्रेसच्या वतीने परभणीत श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ढशन झालेल्या घोटाळ्यात गुन्हे दाखल करण्याची मागणी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** निर्माण आणि व्यवस्थापनाशी संबंधित ट्रस्टमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला आर्थिक घोटाळा व अनियमितता या कटकारस्थानात सहभागी झालेले दोषीवर कारवाई करण्याची मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवार दिनांक 13 जुलै रोजी रघुपती राघव राजाराम सत्याग्रह मोठ्या प्रमाणात करण्यात आला हे आंदोलन.पेढा हनुमान मंदिरासमोर करण्यात आले.

प्रभू श्री रामाने भक्तांना दिलेली देणगी.

ही संघ वाले व भाजपा पदाधिकाऱ्यांनी असून मौल्यवान वस्तू ही गायब केलेले आहेत



भक्तांनी दिलेले दान देणग्याचा दुरुप करून भाविकांच्या भावनाशी खेळ केला आहे मंदिर भावनाशी खेळ केला आहे कमी किमती जास्त भावाने खरेदी करून केला आहे जमिनीचा घोटाळा केला असून याबाबत तक्रार करूनही मुख्य सूत्रधार पडद्यामागेच राहिले असून त्यांना वाचवण्याचा हा प्रकार आहे मुख्य सूत्रधार जोपर्यंत पुढे येत नाही व त्याच्यावर गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत रघुपती राघव राजा राम पतित पावन सिताराम लूट करणाऱ्यांना सुदबुद्धी दे म्हणत टाळ वाजवत आंदोलन करण्यात आले

नवा मोंढा पोलीस स्टेशनला जाऊन श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट यांच्याकडून झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत महंत गोपाल दास चंपत राय गोविंदगिरी यांच्या सह कटात सहभागी असलेले कारवाई करण्याची मागणी करण्यात आली या सत्याग्रह आंदोलनात जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार बाबाजानी दुर्राणी शहराध्यक्ष रविराज देशमुख सिद्धार्थ ते अंबेरे नागशेन बेर्जे रामभाऊ घाडगे अलमगीर खान बंडू पाचलिंग अमोल जाधव अजित वरपूडकर गणेश घाडगे शेख सलमान शेख नासिक नारायण आढाव अमोल देशमुख एकनाथ घाडगे शामराव धर्म हनुमान डाके रावसाहेब मोकाशी केशव बुधवंत वैजनाथ महिपाल राम देशमुख विनोद तरटे सचिन जवंजाळ अभय देशमुख माधव फाजगे प्रल्हाद पारवे रमेश पवार ॲडव्होकेट रमेश जाधव अंतिम अन्सारी असे अन्सारी निखिल धामणगावे सय्यद फिरोज रंगनाथ विरकर आनंद धनले मिलिंद आठवे गालिब भाई नमाखान मलिक सर रजाक कुरेशी साबेर अनिल वजीर आदी सह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यासोबतच दिल्लीच्या भाजपाने नेत्या नाझिया इल्लेखान यांनी जाहीर सभा व समाज माध्यमातून मोहम्मद पैगंबर यांच्या विषयी आक्षेपहर. वादग्रस्त वक्तव्य केलेले आहे त्यामुळे देशभरातील समाजात तीव्र संताप पसरला असून नाझिया इलाई खान यांच्यावर गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदनही जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने नवा मोंढा पोलीस स्टेशनमध्ये देण्यात आले

## पायाभूत प्रकल्पांची निधीटंचाई दूर करण्यासाठी 'अर्बन चॅलेंज फंड'

**मुंबई :** शहरांच्या प्रगतीतील आर्थिक व प्रशासकीय अडथळे दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अर्बन चॅलेंज फंड' तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाधारित शहरी योजनांसोबतच, शहरांच्या संस्थात्मक आणि आर्थिक मर्यादांमुळे रखडणाऱ्या पायाभूत प्रकल्पांना गती देण्यासाठी हा फंड महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केला. या अभियानांतर्गत कर्ज रोखे आणि खासगी-सार्वजनिक भागीदारीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उभारणी केली जाणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी नगर विकास विभागाची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली.

## बार्टीला पूर्णवेळ महासंचालक द्या; संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या शासकीय स्वायत्त संस्थेला मागील पाच महिन्यापासून पूर्णवेळ महासंचालक नाहीत. त्यामुळे बार्टीच्या माध्यमातून सुरू असलेल्या योजना प्रभावीपणे अमलात येतांना दिसत नाही. यासंदर्भात अतिरिक्त कार्यभार असलेल्या महासंचालकांची भेट घेऊन प्रश्न मांडणे विद्यार्थ्यांना अवघड झाले आहे. त्यामुळे स्वयंदीप सोशल फाउंडेशन पुणे यांनी मे २०२६ मध्ये मा. संजय शिरसाट (कॅबिनेट मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) आणि प्रधान सचिव मा. हर्षदीप कांबळे यांना निवेदन देऊन लवकरात लवकर महासंचालकांनी नेमणूक करण्यात यावी अशी मागणी केली होती. परंतु अद्यापही पूर्णवेळ महासंचालकाची नियुक्ती झालेली नसल्याने माननीय मंत्री संजय शिरसाट साहेबांना स्मरणपत्र संस्थेच्या वतीने संस्थेचे सभासद कल्पना कांबळे आणि भीमराव मोटे यांनी आज प्रत्यक्ष भेट घेऊन दिले.

**CHANGE OF NAME** हिंदू प्रकाशवार्ता

**OLD NAME : CHAUS MUJAHEED RAZA**
**Residing At Post Shivna.Tq.Sillod.Dist Chh.Sambhajinagar [431132],**
**have changed my name to**
**NEW NAME,MUJAHID RAZA CHAUS**
**and shall hereafter be known as**
**Name : MUJAHID RAZA CHAUS**
**for all purposes.**

## प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा एल्गार; परभणीत कामबंद आंदोलन

### जुनी पेन्शन योजनेसह विविध प्रलंबित प्रश्नांवरुन कर्मचारी आक्रमक

**परभणी :** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित आणि न्याय्य मागण्यांसाठी राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यव्यापी बेमुदत संपाची हाक देण्यात आली आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील वर्ग तीन आणि वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांनी या संपात सक्रिय सहभाग नोंदवत पूर्णपणे कामबंद आंदोलन सुरू केले आहे. राज्य शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळे अखेर कर्मचाऱ्यांना या आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे.

कर्मचारी संघटनेच्या वतीने यापूर्वी राज्य सरकारला आपल्या विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक आणि अनेक प्रशासकीय समस्यांचा समावेश आहे. या मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागण्यांच्या पूर्ततेसाठी संघटनेकडून वारंवार पाठपुरावा करण्यात आला, मात्र शासनाकडून कोणताही ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांनी सामूहिक रित्या कामबंद आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

या बेमुदत कामबंद आंदोलनामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील दैनंदिन प्रशासकीय आणि मैदानी कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाज पूर्णपणे ठप्प केल्यामुळे नागरिकांची कामे रखडण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या गंभीर परिस्थितीत तातडीने हस्तक्षेप करून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक व सन्मानजनक तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून केली जात आहे. या आंदोलनात सी. एम वकडगावकर, टी. एस भोसले, आर. एम. कुमदळे, संतोष सालमाटे, जोगदंड, बाळासाहेब लहामगे यांच्यासह श्रीमती घेवारे, श्रीमती पवार, श्रीमती वाघमारे आणि इतर सर्व वर्ग तीन व वर्ग चारचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

## "FDA कारवाई सुरूच राहणार, नियमांशी तडजोड खपवून नाही घेणार"

### तुकाराम मुंढेंचा स्पष्ट इशारा

**मुंबई :** मुंबईत आणि संपूर्ण महाराष्ट्रात व्यापक स्तरावर कारवाई सुरू केलेली आहे. या कारवाईचे सकारात्मक परिणाम प्रत्यक्ष दिसायला लागले आहेत. नियम मोडणाऱ्यांची गय केली जाणार नाही. तसेच नियमांची तडजोड खपवून घेतली जाणार नाही. अन्न व औषध प्रशासन विभाग कारवाई सुरूच ठेवणार, असे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.

आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाचा पदभार स्वीकारल्यापासून राज्यभरात छापे टाकले जात आहेत. अनेक कारखान्यांमध्ये छापे टाकत भेसळ उघड केली आहे, अनेक कार्यालयांना मुंढे यांनी टाळे लावले आहे. या धडक कारवायांमुळे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. एफडीए कारवाईमुळे मुंबईसह राज्यातील खाद्यपदार्थ विक्रेते आणि मोठ्या रेस्टॉरंट्सचे धाबे दणाणले असून, सर्वसामान्यांकडून मात्र या मोहिमेचे स्वागत केले जात आहे.

## डायल 112 वर खोटी माहिती देऊन पोलिसांची फिरकी घेणाऱ्याची लॉकअपमध्ये रवानगी!

### छत्रपती संभाजीनगरमधील हर्सूल परिसरातील घटना; पोलिसांचा वेळ आणि मनुष्यबळ वाया घालवल्याने गुन्हा दाखल

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळावी यासाठी शासनाने 'डायल ११२' ही हेल्पलाईन सुरू केली आहे. मात्र, काही महाभाग या सुविधेचा गैरवापर करून पोलिसांची दिशाभूल करत असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. असाच एक खोडसाळपणा छत्रपती संभाजीनगरमधील हर्सूल परिसरातील एकतानगर येथे घडला आहे. पोलिसांची फिरकी घेऊन त्यांचा अमूल्य वेळ वाया घालवणाऱ्या एका ३२ वर्षीय युवकाला हर्सूल पोलिसांनी चांगलाच धडा शिकवत त्याची थेट लॉकअपमध्ये रवानगी केली आहे.विक्रांत गोवर्धन राठोड (वय ३२, रा. एकतानगर, जटवाडा रोड, हर्सूल) असे गुन्हा दाखल होऊन ताब्यात घेण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणी हर्सूल पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार शांताराम फरकाडे यांनी फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (१२ जुलै) सायंकाळी संशयित विक्रांत राठोड याने 'डायल ११२' या पोलीस नियंत्रण कक्षाच्या क्रमांकावर कॉल केला. फोनवर त्याने अत्यंत घाबरलेल्या आवाजात पोलिसांना सांगितले की, "माझ्या भावाला कोणीतरी चाकूने मारत आहे आणि माझ्या आईलाही कोणीतरी जिवंत जाळण्याचा प्रयत्न करत आहे, आम्हाला तातडीने मदतीची गरज आहे!" नियंत्रण कक्षाकडून ही गंभीर माहिती रविवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास हर्सूल पोलिसांना देण्यात आली. घटनेचे गांभीर्य ओळखून हर्सूल पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार शांताराम फरकाडे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह तातडीने विक्रांतने सांगितलेला पत्ता गाठला. घटनास्थळी पोहोचण्यासाठी पोलिसांनी गाडी सुसाट पळवली होती. पोलीस पथक तातडीने एकतानगर येथे पोहोचले, मात्र तिथे गेल्यानंतर पोलिसांना कोणताही अनुचित प्रकार घडल्याचे दिसून आले नाही. परिसरात शांतता होती. पोलिसांनी लागलीच विक्रांतकडे याविषयी विचारणा केली. त्यावर त्याने अत्यंत बेजबाबदारपणे उत्तर देत, "मला तसा भ्रम झाला होता," असे सांगितले.यानंतर पोलिसांनी घरात जाऊन विक्रांतची आई चांगुनाबाई राठोड आणि भाऊ श्रीकांत राठोड यांच्याकडे चौकशी केली. तेव्हा त्यांनी घरात किंवा परिसरात असा कोणताही वाद किंवा हिंसक प्रकार झाला नसल्याचे स्पष्ट केले. विक्रांतने केवळ खोडसाळपणा करून आणि पोलिसांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने हा खोटा कॉल केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. विक्रांतच्या या कृत्यामुळे पोलीस दलाची धावपळ झाली, तसेच अत्यंत संवेदनशील असलेल्या आपत्कालीन सेवेचा वेळ आणि मनुष्यबळ विनाकारण वाया गेले. कर्तव्यात कसूर पाडल्याप्रकरणी आणि पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी हर्सूल पोलिसांनी विक्रांत राठोडविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार सुनिता वालदे करत आहेत. "डायल ११२ हा क्रमांक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आहे. त्यावर कोणीही खोटे कॉल करून पोलिसांची दिशाभूल करू नये, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल," असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## आषाढीसाठी हिंगोली मार्गे धावणार पंढरपूर येथे विशेष रेल्वे खा.डॉ रामराव वडकुते यांच्या पाठपुराव्याला यश

**हिंगोली :** हिंगोली |राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, आषाढी एकादशीच्या



महाउत्सवासाठी अकोला- पंढरपूर ही विशेष रेल्वे गाडी सोडण्याची घोषणा रेल्वे विभागाने केली आहे.

आषाढी एकादशीनिमित्त मराठवाडा आणि विदर्भातून लाखो भाविक पंढरपूरकडे रवाना होतात. या भाविकांच्या सोयीसाठी २४ जुलै रोजी पंढरपूरसाठी विशेष रेल्वे गाडी सोडावी, अशी मागणी भाजपा नेते खासदार रामराव वडकुते यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. त्यावर रेल्वेमंत्र्यांनी पत्र पाठवून लवकरच उपाययोजना केल्या जातील असे कळविले होते. त्यानुसार भाविकांच्या सोयीसाठी रेल्वे विभागाने अकोला- पंढरपूर विशेष गाडी चालवण्याची घोषणा केली आहे.

शुक्रवार, २४ जुलै रोजी ०७६३५ अकोला पंढरपूर ही गाडी अकोल्याहून सकाळी ११.०० वाजता सुटेल आणि शनिवार, २५ जुलै रोजी सकाळी ९.२० वाजता पंढरपूरला, वाशिममार्गे दुपारी १२.०० वाजता, हिंगोली मार्गे दुपारी १२.५४ वाजता, वसमत येथे दुपारी २ वाजता, २.३० वाजता परभणी येथे पोहोचेल. परतीच्या प्रवासात, गाडी क्रमांक ०७६३६ शनिवार, २५ जुलै रोजी पंढरपूरहून दुपारी ४ वाजता सुटेल आणि परभणी (सकाळी १०.२५), पूर्णा (सकाळी ११), वसमत (सकाळी ११.४०), हिंगोली (दुपारी १२.३०), वाशिम (दुपारी १.१५) मार्गे रविवारी दुपारी ४.५० वाजता अकोला येथे पोहोचेल.

भाजपा नेते खासदार रामराव वडकुते यांच्या पाठपुराव्यानुसार रेल्वे विभागाने आषाढी एकादशीसाठी विशेष रेल्वेची घोषणा केल्याने पंढरपूर येथे दर्शनाकरिता जाणाऱ्या भाविकांची सुविधा होणार आहे.

## देशी गोवंश जतन गोसंवर्धन दिन 22 जुलैला साजरा करावा - नितीन जाधव गोगलगावकर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**गौरक्षक सेना महाराष्ट्र कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी वतीने महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोग महाराष्ट्र सरकार व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र सरकार यांच्या आव्हानाने प्रतिसाद म्हणून 22 जुलै 2025 पासून सुरू झालेला शुद्ध देशी गोवंश जतन गोसंवर्धन दिन साजरा करण्याचे आव्हान केले होते तर पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोग राज्यमंत्री दर्जा चे अध्यक्ष शेखरजी मुंदडा यांच्या य पुढाकारातून व राज्य माता गोमाता संवाद यात्रा मुख्य सारथी नितीन चिलवंत यांच्या मार्गदर्शनानुसार आव्हानाला प्रतिसाद म्हणून याही वर्षी महाराष्ट्रातल्या सर्व राज्यातल्या गोशाळा संवर्धन केंद्र पशुसंवर्धन विभाग केंद्र गोरक्षक संघटना गो सेवक गोपालक गो संचालक गोउद्योजक गोव्यापारी गो उउत्पादक गोव्यवसायिक गोविक्रेते गोखरेदीकार गोकताकार गो कीर्तनकार गो समाज प्रबोधनकार गोभक्त गोप प्रेमी गुरखी गोशेतकरी गो किसान गोमहिला सेवक सर्व गोसेवक संघटना यांनी आपापल्या कार्यालयात किंवा आपल्या गोशाळेत किंवा आपल्या केंद्रात किंवा आपल्या कॉलनी गावात व राज्य माता गोमाता चे पूजन गो सन्मान करावा व गो संवर्धन अभियान गोमातेसाठी आरोग्य पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून तपासणी शिबिर गोसेवक व पालक गोरक्षकांचे सन्मान करावे गोमातेचे गोमाता सप्ताह राज्य गोमाता दिंडी मिरवणूक गावात किंवा शहरात काढावी या माध्यमातून गोमातेच्या जनजागृती प्रसार होईल गावातील प्रतिष्ठित व्यक्ती बोलून गोमातेचे पूजन करावे असे आव्हान कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी चे मुख्य चेअरमन गौरक्षक नितीन जाधव गोगलगावकर यांच्या वतीने सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्व गोप्रेमींना आव्हान केले आहे 22 जुलै शुद्ध देशी गोवंश जतन गो संवर्धन दिन साजरा जास्त जास्त संख्येने उपक्रम राबवावे जय गोमाता जय भारत माता अशी माहिती गौरक्षक सेना मराठवाड्याचे अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी 24 जुलैपर्यंत अर्ज करा

**परभणी, दि. १३ (जिमाका) :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.)मार्फत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून, पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून २४ जुलैपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.

या योजनेअंतर्गत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय, अभियांत्रिकी आदी अभ्यासक्रमांमध्ये विशेष प्राविण्य मिळवून ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. शिष्यवृत्तीचे वितरण मुख्यालय, मुंबई यांच्याकडून उपलब्ध निधीनुसार गुणवत्तेच्या क्रमाने करण्यात येणार आहे.

अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्यांचा जातीचा दाखला, तहसीलदार यांच्याकडील उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड व रेशन कार्डच्या छायाप्रती, गुणपत्रिका, दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे तसेच बोनाफाईड प्रमाणपत्र अथवा पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.

इच्छुक व पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगाव रोड, परभणी येथे दि. १४ जुलै २०२६ ते २४ जुलै २०२६ या कालावधीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांनी भरला विशेष सखोल पुनरीक्षणाचा गणना फॉर्म

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांनी स्वतःचा गणना फॉर्म भरून या मोहिमेत सहभाग नोंदविला.




यावेळी संबंधित निवडणूक यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडून आवश्यक माहिती घेऊन फॉर्म भरण्याची प्रक्रिया पूर्ण केली. प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत गणना फॉर्म भरून अचूक माहिती सादर करावी, तसेच मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन श्रीमती माथुर यांनी केले.

## स्वाभिमानीचा उप निबंधक यांच्या कार्यालयात तिन तास ठिय्या आंदोलन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :** पूर्णा तालुक्यातील ताडकळस बाजार समितीच्या आवारात श्रीपाद ट्रेडिंग कंपनीच्या संचालक यांनी शेतकऱ्यांचा माल खरेदी केला त्यात प्रामुख्याने सोयाबीनहे होते काही शेतकऱ्यांना थोडे बहुत पैसे दिले. आणि बऱ्याच शेतकऱ्यांना एक रुपया सुद्धा दिला नाही. शेतकऱ्यांनी वारंवार मार्केट कमिटी सचिवा कडे तक्रार केली एक महिन्या पूर्वी उप निबंधक यांच्या कडे तक्रार केली होती परंतु व्यापारी यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. एकीकडे तुडपुंज्या पाऊसावर शेतकऱ्यांनी पेरणी केली तेव्हा पासुन पाऊसाचे दांडी मारली शेतातले पीक जळून जात आहे. आणि मागील वर्षी दिलेले सोयाबीन चे पैसे व्यापारी देत नाही आणि तो ताडकळस सोडुन आपल्या आई वडिलांना बायको पोरांना घेऊन पळून गेला आहे.

बाजार समितीने व्यापाऱ्याला पाठीशी घातल्या मुळे ताडकळस परिसरातील शेतकरी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यालयात आपली तक्रार नोंदवली तेव्हा स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी व शेतकऱ्यांनी परभणी येथील उप निबंधक यांच्या कार्यालयात जाऊन ठिय्या आंदोलन सुरू केले. त्यानंतर उप निबंधक यांनी ताडकळस बाजार समितीच्या सचिवांना तात्काळ पत्र काढून संबंधित व्यापाऱ्यावर तात्काळ पोलिस स्टेशन मध्ये जाऊन गुन्हा नोंदवा व त्याचे मार्केट कमिटी मध्ये असलेले दुकान जे त्या व्यापाऱ्याने विकुन फरार झालेला होता. ते दुकानाचा फेर तात्काळ रद्द करण्यात यावा असे असे पत्र देण्यात आले तेव्हा आंदोलन मागे घेण्यात आले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने उप निबंधक यांना दोन दिवसाचा वेळ देण्यात आला. या दोन दिवसाच्या आत व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल झाला नाही तर परत स्वाभिमानी आपल्या स्टाईलने आंदोलन करणार असे सांगण्यात आले. जो पर्यंत शेतकऱ्यांचे पैसे व्यापारी देणार नाही तो पर्यंत स्वाभिमानी शेतकऱ्यांच्या बाजूने ठाम पणाने लढणार ...

यावेळी किशोर ढगे, मुंजा लोडे, माऊली शिंदे,राम गोळेगावकर, भगवान अंभोरे, मुंजा अंभोरे, गजानन अवरगंड, जनार्धन होणमाने यांच्या सह मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

## मतदार यादी सखोल पुनरीक्षण जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांची साथ महत्त्वाची – तहसीलदार डॉ. संदीप राजापुरे

### प्रशिक्षण कार्यक्रम ; विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवावा

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :**लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभागात असणाऱ्या बीएलओंना एसआयआर च्या कामात सहकार्य करून मतदार याद्यांच्या विशेष सखोल पूनरिक्षण जनजागृतीचे काम हाती घ्यावे. मतदार यादी सखोल पुनरीक्षण जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांची साथ महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन तहसीलदार डॉ.संदीप राजपुरे यांनी केले.

भारत निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (Special Summary Revision - SSR/SIR) कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर श्री शिवाजी महाविद्यालयात विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय स्वंयसेवक विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक यांच्यासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार यादी विशेष सखोल पूनरीक्षण कार्यक्रम प्रशिक्षण कार्यशाळा सोमवार दिनांक 13 जुलै रोजी उत्साहात पार पडली.

यावेळी मार्गदर्शक म्हणून तहसीलदार डॉ.संदीप राजपूरे यांची उपस्थिती होती. तसेच यावेळी विशेष सखोल पूनरीक्षन नोडल अधिकारी प्रा. गणेश शिंदे,श्री शिवाजी महाविद्यायाचे उपप्राचार्य एन.एन.राऊत यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेत तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे यांनी मतदार नोंदणी, नाव वगळणे, दुरुस्ती, पत्ता बदल, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, बीएलओची भूमिका तसेच नागरिकांच्या मनातील विविध शंकांचे सविस्तर निरसन केले.तसेच मतदार याद्यांचे सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील महत्वाच्या प्रश्नांची (FAQ) माहिती देण्यात आली.

नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील दुरुस्ती, ऑनलाइन सेवा, विशेष मोहीम दिवस, ई-ईपीआयसी, अर्जाचे प्रकार आणि पडताळणी प्रक्रिया याबाबत देखील तहसीलदार डॉ.संदीप राजपुरे यांनी मार्गदर्शन केले.प्रास्ताविकातून नोडल अधिकारी प्रा. गणेश शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय स्वंयसेवक विद्यार्थ्यांना विशेष सखोल पुनरिक्षन कार्यक्रमाची आपल्या परिसरात जनजागृतीचे काम कशा पद्धतीने करावे याबाबतीत सांगितले.सूत्रसंचालन त्र्यंबक वडसकर यांनी केले.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण पथकातील मोहन आल्हाट, अरविंद शहाणे, रामप्रसाद अवचार, प्रफुल्ल शहाणे यांच्यासह विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.डॉ.गणपत भिसे,प्रा.डॉ.नसीम बेगम, प्रा.माणिक कदम. प्रा.योगेश कुऱ्हाडे, प्रा.डॉ.सुरेश भालेराव, प्रा. डॉ.सचिन खडके,साळवे आदींनी पुढाकार घेतला.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी,प्राध्यापक,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवानंद पवार यांच्या कवितेचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरी चळवळीतील प्रख्यात साहित्यिक व कवी देवानंद पवार यांच्या 'मायचं चित्रंग' या लोकप्रिय कवितेचा समावेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. भाग-३ (सत्र ६) च्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. 'काळोखाला भेदणारा सूर्य' या काव्यसंग्रहातील ही कविता ग्रामीण संस्कृती, मातृत्व आणि मातृभूमीवरील प्रेम प्रभावीपणे व्यक्त करते.

देवानंद पवार यांची 'काळोखाला भेदणारा सूर्य', 'सब्बे सत्ता सुखी होंतू' हे काव्यसंग्रह तसेच 'भीमवाडीचा प्रवासी' ही लेखमाला विशेष चर्चेत राहिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्कार (दुबई), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक गौरव पुरस्कार (चंद्रपूर) यांसह अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

ग्रामीण बोलीभाषेचा गोडवा जपणारी ही कविता अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्याने विद्यार्थ्यांना आपल्या माती, संस्कृती आणि मातृत्वाच्या मूल्यांशी नव्याने जोडले जाण्याची संधी मिळणार आहे. "माझ्या कवितेला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात स्थान मिळणे हा माझ्या लेखणीचा आणि मायबोलीचा सन्मान आहे," अशी भावना देवानंद पवार यांनी व्यक्त केली.

## रामराज्य ग्रुपच्या राज्यव्यापी वृक्षारोपण मोहिमेचा प्रारंभ

### मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रामराज्य ग्रुपतर्फे राज्यभर १० हजार वृक्ष लागवडीचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या राज्यव्यापी वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पहिले वृक्ष लावून करण्यात आला.

यावेळी रामराज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रामाभाऊ मुळे, आयोजक सचिन राठोड, राजू राठोड, माऊली तोडमल, आदिनाथ मुळे, रणजीत राठोड, शुभम डमाळे पाटील, शुभम नेव्हळ, अमोल धनवटे, साहिल राठोड, अनिल औताडे, अविनाश दौंड, अभि राजपूत, विठ्ठल उबाळे, विशाल दांडगे, मयूर वैष्णव, ऋषी जाधव, शैलेश चव्हाण, सौरभ भोजने, विशाल सरोदे, अशोक औताडे यांच्यासह रामराज्य ग्रुपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मंत्री अतुल सावे यांनी रामराज्य ग्रुपच्या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक करत, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. राज्यभर टप्प्याटप्प्याने १० हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प रामराज्य ग्रुपने केला असून, पर्यावरण संरक्षणाबरोबरच जनजागृती करण्याचाही या मोहिमेचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## लखपती दीदी संकल्पपूर्तीसाठी शिवना येथे घराघरात सर्वेक्षण मोहीम

### वंचित महिलांना स्वयंसहाय्यता समूहात सामील करण्यावर भर





**अजिंठा प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या 'लखपती दीदी' उपक्रमांतर्गत राज्यातील एक कोटी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या संकल्पपूर्तीसाठी शिवना प्रभागात सोमवारी (दि. १३) ग्रामसखींच्या माध्यमातून घराघरात सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ग्रामसखींनी प्रत्येक कुटुंबाला प्रत्यक्ष भेट देऊन स्वयंसहाय्यता समूहाबाहेर असलेल्या महिलांची माहिती संकलित केली तसेच त्यांना महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सविस्तर माहिती देऊन बचतगटात सहभागी होण्याचे आवाहन केले.

या अभियानाचा मुख्य उद्देश स्वयंसहाय्यता समूहापासून वंचित असलेल्या महिला, अनुसूचित जाती-जमाती, एकल महिला, विधवा, परित्यक्ता, दिव्यांग, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे तसेच इतर गरजू महिलांना समूहात समाविष्ट करून त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे. समूहामध्ये सहभागी झाल्यानंतर महिलांना स्वयंरोजगार, उपजीविका वृद्धी, बचत, कर्ज सुविधा, कौशल्य विकास तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध होणार असल्याची माहिती ग्रामसखींनी नागरिकांना दिली.

माननीय मुख्यमंत्री यांनी राज्यातील एक कोटी महिलांना 'लखपती दीदी' बनविण्याचा संकल्प जाहीर केला असून, त्याअंतर्गत राज्यभरात सुमारे ३५ लाख महिलांना स्वयंसहाय्यता समूहात समाविष्ट करून ३.५ लाख नवीन समूह स्थापन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सन २०२६-२७ या वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला १२,७२१ नवीन समूह स्थापन करण्याचे, तर सिल्लोड तालुक्याला १,६६८ समूहांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. हे उद्दिष्ट निश्चित कालावधीत पूर्ण करण्यासाठी तालुकाभर मोहीम स्वरूपात काम सुरू आहे.

शिवना प्रभागात ग्रामसखींच्या दोन ते तीन पथकांची स्थापना करून घरभेटींद्वारे सर्वेक्षण करण्यात येत असून, एकही पात्र महिला या अभियानापासून वंचित राहणार नाही, याची विशेष काळजी घेतली जात आहे.

यावेळी पंचायत समिती सदस्य शेख सलीम शेख भिकन यांनी महिलांनी स्वयंसहाय्यता समूहात सहभागी होऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, असे आवाहन केले. ग्रामसेवक रवींद्र गंगावणे यांनीही या अभियानासाठी ग्रामपंचायतीचे पूर्ण सहकार्य राहील, असे सांगत ग्रामसखींच्या कार्याचे कौतुक केले.

ही मोहीम माननीय गटविकास अधिकारी श्री. पगार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे तालुका अभियान व्यवस्थापक तुषार बर्गड, नवनाथ पवार, प्रभाग समन्वयक प्रवीण लोखंडे तसेच अभियानातील अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

## दौलताबादचे पोलीस निरीक्षक; नितीन खंडागळे यांचा प्रेरणादायी प्रवास

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी :** खुलताबाद शहरां मध्ये शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या आणि जिद्द, मेहनत व कर्तृत्वाच्या जोरावर पोलीस निरीक्षकपदापर्यंत भरारी घेतलेल्या नितीन आप्पासाहेब खंडागळे यांनी नुकताच दौलताबाद पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदाचा पदभार स्वीकारला आहे. आपल्या खुलताबाद शहरातील वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्याने पोलीस दलात उच्च पद गाठल्याने खुलताबादकरांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांचे वडील आप्पासाहेब खंडागळे हे सन १९९९ ते २००४ या कालावधीत खुलताबाद पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत होते. त्यावेळी बातमीदारी करतांनी आप्पासाहेब खंडागळे साहेबांचा जवळून संबध आला होता.

त्या काळात खंडागळे कुटुंबीय पोलीस वसाहतीत वास्तव्यास होते. नितीन खंडागळे यांनी इयत्ता आठवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण श्री घृष्णेश्वर महाविद्यालय, खुलताबाद येथे, तर पदवी शिक्षण चिश्तिया महाविद्यालय, खुलताबाद येथे पूर्ण केले.

शिक्षणानंतर त्यांनी पोलीस उपनिरीक्षक म्हणून परभणी, नांदेड व गंगाखेड येथे सेवा बजावली. त्यानंतर पदोन्नती होऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून मुदखेड, बारड, येवला आदी ठिकाणी जबाबदारी सांभाळली. अलीकडेच पोलीस निरीक्षकपदी बढती मिळाल्यानंतर ते अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर येथे कार्यरत होते. तेथील कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांची छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयांतर्गत दौलताबाद पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. नवीन पदभार स्वीकारल्यानंतर सोमवारी पत्रकार सुनील घोडके यांनी दौलताबाद पोलीस ठाण्यात भेट घेऊन नितीन खंडागळे यांचा सत्कार केला. यावेळी खंडागळे यांनी खुलताबादमधील शालेय व महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. तसेच, "पत्रकारांना आम्ही लहानपणी जवळून पाहिले आहे. खुलताबादशी माझे जिव्हाळ्याचे नाते कायम राहील," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

यावेळी त्यांच्या भेटीने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. आपल्या मातीत वाढलेला एक विद्यार्थी आज पोलीस निरीक्षकपदापर्यंत पोहोचल्याने खुलताबादकरांमध्ये अभिमानाची भावना व्यक्त होत असून, त्यांच्या पुढील सेवाकार्यासाठी शुभेच्छांचा

## जो पर्यन्त मोबदला ठरत नाही तो पर्यत जमिनीची मोजणी करु नाही

### शेंद्रा बिडकीन ढोरेगाव शेतकऱ्यांचा एकमुखी ठराव



**बिडकीन दि १३ जुलै :** बिडकीन खंडोबा मंदिर येथे दि १२ रविवार रोजी सकाळी बारा वाजेच्या सुमारास येथे शेंद्रा - बिडकीन - ढोरेगाव ग्रीन फील्ड रस्त्या संदर्भात पैठण, गंगापूर, करमाड गावातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी ग्रीन फील्ड रस्त्यासाठी शासन हस्तांतरित करणार असून ज्या गावातील गटामधून ग्रीन फील्ड रस्ता जाणार आहे त्या गटातील मोठया प्रमाणात शेतकरी मोठ्या संख्येने हजर होते. एकमताने शेतकऱ्यांनी ठराव केला की जो पर्यत जमीन भुसंपादनाचा योग्य भाव व मोबदला मिळत नाही तो पर्यत शेतकरी कुठलीही मोजणी होऊ देणार नाहीत.शेवटपर्यंत शेतकऱ्यांनी लढा देण्याचे ठरवले. प्रथम शासनाने जमिनीचा भाव ठरवावा त्यानंतर सर्व गोष्टी शासनाने कराव्यात. लवकरच सर्व शेतकरी यांच्या उपस्थितीत व शेंद्रा बिडकीन ढोरेगाव शेतकरी समिती तर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे. या वेळी सरपंच अशोक धर्मे, उपसरपंच किरण गुजर, गणेश सोनवणे, नंदकुमार वैद्य,ॲड संचित पातूणकर, ग्रामस्थ,शेतकरी यांनी मार्गदर्शन केले.यावेळी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती,

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# आरोग्य सेवेच्या अंमलबजावणीचा आयुक्तांकडून आढावा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य उपक्रमांचा सविस्तर आढावा सोमवारी आयएमए हॉल, समर्थनगर येथे घेण्यात आला. शहरी आरोग्य सेवा आयुक्त डॉ. सुनील भोकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत छत्रपती संभाजीनगर व लातूर आरोग्य परिमंडळातील योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

यावेळी सहसंचालक डॉ. प्रसाद भंडारी व राज्य कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमोल बाग यांनी आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, नागरिकांना दर्जेदार व सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे, गुणवत्ता आश्वासन, आर्थिक व्यवस्थापन आणि आरोग्य संस्थांची कार्यक्षमता वाढविण्यावर मार्गदर्शन केले. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

बैठकीस दोन्ही परिमंडळांतील आरोग्य उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधिकारी, कार्यक्रम व्यवस्थापक, गुणवत्ता आश्वासन समन्वयक तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# नशामुक्त व बालविवाहमुक्त छत्रपती संभाजीनगरचा निर्धार

## जिल्हास्तरीय अभियानाचा शुभारंभ; विद्यार्थ्यांची शपथ, लोगोचे विमोचन आणि जनजागृतीचा संदेश



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** व्यसनमुक्त आणि बालविवाहमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद, जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, नशामुक्त भारत अभियान जिल्हा समिती, पोलीस विभाग, शिक्षण विभाग तसेच जय विश्वकर्मा सर्वोदय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नशामुक्त छत्रपती संभाजीनगर अभियान' आणि 'बालविवाह मुक्त छत्रपती संभाजीनगर पंधरवडा' (१३ ते ३१ जुलै) याचा शुभारंभ सोमवारी एमआयटी कॉलेजच्या मंथन हॉलमध्ये उत्साहात झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे आणि जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. होत्या. विद्यार्थ्यांनी नशामुक्ती आणि बालविवाहमुक्ती या विषयांवरील आकर्षक रांगोळ्या साकारून कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली.

कार्यक्रमात राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अभिनव बालुरे, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त डॉ. दीपक खरात, मानसिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. जितेंद्र डोंगरे, उपशिक्षणाधिकारी दीपाली थावरे, अमली पदार्थ टास्क फोर्सचे उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवरगावकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रास्ताविक शिक्षण अधिकारी अश्विनी लाठकर यांनी केले, तर अभियानाची उद्दिष्टे विलास चंदने यांनी स्पष्ट केली. यावेळी अभिनव बालुरे यांनी उपस्थितांना नशामुक्तीची शपथ दिली. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते 'बालविवाह मुक्त छत्रपती संभाजीनगर' या अभियानाच्या लोगोचे विमोचन करण्यात आले. महादेव डोंगरे यांनी बालविवाहमुक्तीची शपथ दिली.

मार्गदर्शन सत्रात अभिनव बालुरे आणि डॉ. जितेंद्र डोंगरे यांनी पीपीटीद्वारे अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत तसेच मानसिक आरोग्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. गीता बागवडे यांनी बालविवाहमुक्त समाजनिर्मितीसाठी व्यापक जनजागृतीची गरज अधोरेखित केली. डॉ. कृष्णा रामचंद्र भावले यांनी व्यसनमुक्ती, समाजसहभाग आणि जनजागृतीचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमस्थळी मुक्ताई व्यसनमुक्ती केंद्र, सहारा व्यसनमुक्ती केंद्र आणि नशाबंदी मंडळाच्या वतीने नशामुक्ती विषयक पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले. मान्यवरांचे स्वागत विलास चंदने लिखित 'आत्मसंयम' या अमली पदार्थविरोधी ग्रंथाचे वितरण करून करण्यात आले. व्यसनमुक्त झालेल्या एका युवकाने स्वतःचे अनुभव कथन करत उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत यांनी स्वागत केले, तर जय विश्वकर्मा सर्वोदय संस्थेच्या वतीने डॉ. शंखपाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन फड सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती लहाने-वाघ यांनी केले.

# राजकारण पलीकडची माणुसकी: अण्णाभाऊ तांगडे यांचा स्तुत्य उपक्रम!



**फर्दापूर :** येथील हिंदू स्मशानभूमीत मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले होते. पावसाळ्याच्या दिवसांत या खड्ड्यांमध्ये पाणी साचून प्रचंड चिखल होत असे. आपल्या जवळच्या माणसाला गमावलेल्या दुःखात असलेल्या नागरिकांना आणि नातेवाईकांना अंत्यसंस्कारासाठी येताना या गैरसोयीमुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.

ही अत्यंत वेदनादायी परिस्थिती ओळखून भारतीय जनता पार्टीचे सोयगाव तालुका उपाध्यक्ष आणि जनसामान्यांचे खंदे आधारस्तंभ अण्णाभाऊ तांगडे यांनी तात्काळ पुढाकार घेतला. कोणतीही शासकीय निधीची किंवा राजकारणाची वाट न बघता, अण्णाभाऊंनी स्मशानभूमीतील त्या सर्व मोठ्या खड्ड्यांमध्ये तातडीने मुरूम टाकून ते व्यवस्थित बुजवून घेतले आणि संपूर्ण परिसर सपाट करून दिला.

विरोधकांसाठी चपराक

काही लोक गावात फक्त निवडणुका आल्या की गट-तट आणि फोडाफोडीचे राजकारण करतात. पण आदरणीय सुरेश पाटील बनकर साहेब आणि मुलतानी साहेबांच्या विश्वासातील अण्णाभाऊंसारखे नेते लोकांच्या दुःखात त्यांच्या पाठीशी उभे राहतात.

अण्णाभाऊ तांगडे यांच्या या संवेदनशील आणि अत्यंत पुण्याच्या कामाबद्दल फर्दापूर येथील सर्व ग्रामस्थांकडून त्यांचे मनःपूर्वक आभार

# बालकांच्या मानसिक आरोग्याला नवे केंद्र; महिलांसाठी 'गायनोकेअर'चीही सुविधा

## न्युरोसायिक माईंड अँड ब्रेन केअर क्लिनिकचा तृतीय वर्धापनदिन उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बालकांच्या मानसिक, भावनिक व विकासात्मक समस्यांवर बहुविषयक उपचार एकाच छताखाली उपलब्ध करून देणाऱ्या 'बालमन चाइल्ड डेव्हलपमेंट अँड थेरेपी सेंटर' तसेच महिलांसाठी आधुनिक आरोग्यसेवा देणाऱ्या **'गायनोकेअर वुमेन्स क्लिनिक'**चे उद्घाटन न्युरोसायिक माईंड अँड ब्रेन केअर क्लिनिकच्या तृतीय वर्धापनदिनानिमित्त रविवारी (१२ जुलै) करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड होते.



डॉ. गायकवाड यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे बालकांमधील मानसिक व विकासात्मक समस्यांमध्ये वाढ होत असून, अशा मुलांसाठी बहुविषयक उपचारपद्धतीची गरज अधोरेखित केली. हे केंद्र अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिलांसाठी दर्जेदार व विश्वासार्ह आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात 'गायनोकेअर'ची महत्त्वाची भूमिका राहील, असेही ते म्हणाले.

डॉ. जितेंद्र डोंगरे यांनी ऑटिझम, एडीएचडी, वर्तन समस्या व मानसिक आजारांचे लवकर निदान आणि उपचार आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. भारत सोनवणे यांनी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी वैद्यकीय उपचार, मानसोपचार आणि कुटुंबाचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे नमूद केले. यावेळी डॉ. विशाल आर. वाठोरे यांनी 'बालमन' केंद्रात ऑटिझम, एडीएचडी, शिकण्यातील अडचणी, वर्तन समस्या, प्ले थेरपी, बिहेव्हिअर थेरपी, मानसशास्त्रीय मूल्यमापन व पालक प्रशिक्षण यांसह बहुविषयक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती दिली. डॉ. पूजा खिल्लारे यांनी किशोरवयीन मुलींपासून ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्वांसाठी आधुनिक स्त्रीरोग सेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाला डॉ. एम. डी. गायकवाड, अभियंता दुष्यंत आठवले, अॅड. अनिल वरठे, अभियंता अविनाश कांबळे, निवृत्त पोलीस उपअधीक्षक मारोती थोरात यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# दिलेला शब्द 15 दिवसांत पाळला; 80 लाखांच्या सिमेंट रस्त्याचे लोकार्पण

## 'जनतेची नाळ कधीच तुटू देणार नाही' : आ.प्रदीप जैस्वाल



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भगतसिंगनगर–साईनगर परिसरातील नागरिकांना पावसाळ्यात चिखलामुळे होणाऱ्या त्रासाची दखल घेत अवघ्या १५ दिवसांत सुमारे ८० लाख रुपये खर्चाच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम पूर्ण करून त्याचे लोकार्पण आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले. दिलेले आश्वासन अल्पावधीत पूर्ण केल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

लोकार्पणानंतर बोलताना आमदार जैस्वाल म्हणाले, "गेली चार दशके जनतेशी जपलेले विश्वासाचे नाते हीच माझी खरी ताकद आहे. नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडविणे हेच माझे कर्तव्य असून, जनतेची नाळ कधीच तुटू देणार नाही." पंधरा दिवसांपूर्वी नागरिकांनी चिखलाच्या समस्येकडे लक्ष वेधले होते. शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन तातडीने निधी उपलब्ध करून रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या रस्त्यामुळे परिसरातील हजारो नागरिकांची वर्षानुवर्षांची गैरसोय दूर झाली असून, दळणवळण अधिक सुरक्षित आणि सुकर झाले आहे. स्थानिक नागरिकांनी आमदार जैस्वाल यांचे स्वागत करून आभार व्यक्त केले. लोकार्पण सोहळ्यास उपशहरप्रमुख रमेश सूर्यवंशी, राजू अहिरे, रमेश इधाटे, युवासेनेचे नारायण सुरे, महानगर संघटक शारदा घुले, उपशहर संघटक कविता फरकडे, शाखाप्रमुख विक्की लोखंडे तसेच शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला नवी गती; राज्यातील 5,010 आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने आयुष्मान भारत-अंतर्गत समग्र प्राथमिक आरोग्य सेवा (CPHC) अभियानाच्या माध्यमातून दोन दिवसीय उजळणी प्रशिक्षण शिबिरांना वेग दिला आहे. राज्यात आतापर्यंत ११६ प्रशिक्षण बॅचेस पूर्ण झाल्या असून ५,०१० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे.

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), आरोग्य सेवक-सेविका, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी, आशा पर्यवेक्षक आणि आशा स्वयंसेविका सहभागी होत आहेत. प्रत्येक जिल्ह्यात १० प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून प्रशिक्षणाच्या दर्जावर देखरेख ठेवण्यासाठी मेंटर्स आणि जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रशिक्षणाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ सैद्धांतिक मार्गदर्शन न देता प्रत्यक्ष गावभेटी, गृहभेटी, नागरिकांशी आरोग्य संवाद, आजारांचे लवकर निदान, जोखमीच्या व्यक्तींची ओळख आणि आवश्यक संदर्भ सेवांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जात आहे. त्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्रशिक्षणात आयुष्मान आरोग्य मंदिरांमार्फत दिल्या जाणाऱ्या १३ समग्र आरोग्य सेवा पॅकेजेसचा समावेश असून मातृ-बाल आरोग्य, किशोरवयीन आरोग्य, कुटुंब नियोजन, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार, मानसिक आरोग्य, वृद्धांची आरोग्य सेवा, गुणवत्ता सुधारणा, डेटा व्यवस्थापन आणि समुदायाधारित आरोग्य सेवा आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे.

या प्रशिक्षणामुळे राज्यातील प्राथमिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना दर्जेदार, सर्वसमावेशक आणि रुग्णाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला राज्यभर प्रभावी गती मिळणार असल्याचा विश्वास सार्वजनिक आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

# राम मंदिरातील कथित देणगी अपहारप्रकरणी प.पू. प्रसाद महाराजांना शिवसेनेचे निवेदन



## चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाची भेट; अमळनेर अग्नितांडवग्रस्तांना मदतीची ग्वाही

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील कथित देणगी अपहारप्रकरणी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शिवसेनेने सुरू केलेल्या 'रामरक्षा आंदोलन'अंतर्गत शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली प.पू. प्रसाद महाराज (अमळनेर) यांना निवेदन देण्यात आले.

वारीच्या दिंडीत सहभागी असलेल्या प.पू. प्रसाद महाराज यांची बिडकीन येथील कुलकर्णी यांच्या निवासस्थानी शिवसेना शिष्टमंडळाने भेट घेतली. यावेळी श्रीराम मंदिरातील कथित देणगी अपहारप्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

शिष्टमंडळात उपजिल्हाप्रमुख श्रीरंग आमटे पाटील, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, नंदकुमार वैद्य यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी चंद्रकांत खैरे यांनी अमळनेर येथील अग्नितांडवाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत, बाधित नागरिकांच्या पुनर्वसनासाठी आणि उभारणीसाठी शिवसेना भक्कमपणे त्यांच्या पाठीशी उभी राहील, अशी ग्वाही दिली.

# कन्नड न.प.चे मुख्याधिकारी यांना मारहाण; खुलताबाद गिरीश स्थान न.प.कर्मचाऱ्यांकडून निषेध






दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी कन्नड नगर परिषदेचे मुख्य अधिकारी संतोष लांडे यांना कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयातील सदस्यांकडून झालेल्या मारहाणीच्या घटनेचा खुलताबाद गिरीस्थान नगर परिषद कर्मचारी संघटनेच्या वतीने काळी फीत लावून निषेध करून खुलताबाद नगर परिषद कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे पाटील यांना सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

तसेच खुलताबाद तहसील कार्यालयाचे तहसीलदार यांनाही सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने या घटनेचा निषेध करून निवेदनाची प्रत देऊन. संबंधितावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली नगर परिषद कर्मचारी संघटनेच्या वतीने वरिष्ठ लिपिक अंकुश भराड पाटील पाणीपुरवठा अभियंता श्रीहरी चौडेकर. मुख्य लेखापाल किशोर मोरे अश्विनी नंद जितेंद्र बोचरे मनीषा लघाने आप्पाराव देवकर अशोक भंडारे अतीक शेख गणेश रोटे संजू सोंडेवाल राजेंद्र वाघ संतोष आव्हाड सतीश भालेराव भानुदास सोनवणे युसुफ बेग भगवान आव्हाड लक्ष्मण शेजुळ इरफान मामू ऋषिकेश सोनवणे. सुखदेव घुसाळे नितीन गोल्हार राहुल कांबळे शुभम देवकर कासीम बेग अनिल फुलारे शाहरुख शेख फिरोज बेग खास पटेल काशीफ शेख आदी कर्मचारी उपस्थित होते

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या प्रोत्साहनात्मक अनुदान वितरण सोहळ्यात संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा गौरव




हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१३ जुलै :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित प्रोत्साहनात्मक अनुदान २०२५-२६ वितरण,गुणगौरव व सन्मान सोहळा कार्यक्रमात संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगावने उल्लेखनीय यश संपादन केले. महाविद्यालयाने सोयगाव तालुक्यात प्रथम तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळविला.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार व क्रीडा विभागाचे प्रा.शेख तौफिक यांचा जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई तसेच जिल्हा परिषद उपसंचालक शेखर पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी त्यांना प्रथम पारितोषिकाची ट्रॉफी,प्रमाणपत्र तसेच भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या जीवनावरील पुस्तक प्रदान करण्यात आले.महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे हा सन्मान प्राप्त झाला असून या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी,प्राध्यापक, कर्मचारी,विद्यार्थी तसेच पालकांनी डॉ.शिरीष पवार व प्रा. शेख तौफिक यांचे अभिनंदन केले.या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911